नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २०४ Issue - 204 | वार बुधवार दि. ११ डिसेंबर २०२४ Blow- Wednesday Date 11 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### धवलसिंह मोहिते पाटील यांचा काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा

सोलापूर : काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे सोलापुरात असतानाच पक्षाचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील यांनी पक्षाचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांची कन्या खासदार प्रणिती शिंदे यांच्या मनमानीला कंटाळून जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. सोलापूर जिल्ह्यात काँग्रेस पक्ष नसून, शिंदे काँग्रेस असल्याचा आरोप मोहिते-पाटील यांनी राजीनामा पत्रात केला आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांना पाठविलेल्या सहा पानी राजीनामा पत्रात धवलसिंह मोहिते-पाटील यांनी सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या पक्षविरोधी कार्यपद्धतीवर आक्षेप घेतला आहे.

### इंडिया आघाडी महाराष्ट्रातील निकालांविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार

नवी दिल्ली : देशातील इंडिया आघाडीने आणि महाराष्ट्रातील म हाविकास आघाडीने आता महाराष्ट्रातील निकालांविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याची तयारी केली आहे. महाराष्ट्रातील निवडणूक निकालांच्या दरम्यान ईव्हीएमचा घोटाळा झाला आहे असा आरोप इंडिया आघाडीने केला आहे.

आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार या पक्षानचे नेते प्रशांत जगताप यांनी ईव्हीएमच्या विरोधात आम्ही सर्वो च्च न्यायालयात जाणार असल्याचं म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार, आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल आणि काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी यांच्यात एक बैठक पार पडली. त्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. इंडिया आघाडीने हा आरोप केला आहे की भाजपा नेतृत्वातील महायुतीने ईव्हीएममध्ये घोटाळा करुन इतका प्रचंड विजय मि ळवला आहे.

# राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव



## भारताच्या संसदीय इतिहासातील सर्वात मोठी घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नवी दिल्ली : सध्या सुरू असलेले संसदेचे अधिवेशन विविध मुद्द्यांनी गाजत आहेत. अशात राज्यसभेचे सभापती जयदीप धनखड यांच्याविरोधात विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्ताव आणला आहे. दरम्यान काँग्रेसचे नेते कपिल सिब्बल यांनी एक्सवर नुकतीच एक पोस्ट केली आहे. यामध्ये सिब्बल यांनी सांगितेल आहे की, इंडिया आघाडीतील पक्षांनी राज्यसभेचे सभापती जयदीप धनखड यांच्याविरोधात राज्यसभेच्या मुख्य सचिवांकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखर यांच्या विरोधात विरोधकांनी मंगळवारी अविश्वास प्रस्ताव आणला आणि भारताच्या संसदीय इतिहासातील अशा प्रकारची ही पहिलीच कारवाई ठरली.

या अविश्वास प्रस्तावावर सुमारे ७० खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यात काँग्रेस, बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस, अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष, अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्ष, तामिळनाडूचा द्रमुक आणि लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाच्या सदस्यांचा समावेश आहे. राज्यसभेतील संख्याबळ पाहता हा प्रस्ताव नामंजूर होण्याची शक्यता आहे. मात्र विरोधकांना सभापती त्यांना सभागृहात बोलण्याची संधी देत नाहीत, हे सिद्ध करायचे आहे. दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब

आज दोन्ही सभागृहांचे कामकाज चालू झाले तेव्हा सत्ताधाऱ्यांनी जॉर्ज सोरोस यांचा तर विरोधीपक्षांनी उद्योगपती गौतम अदाणी यांचा मुद्दा उचलून धरला आहे. या मुद्द्यांवरूनच सत्ताधारी तसेच विरोधकांनी केलेल्या गोंधळानंतर आधी लोकसभेची तर नंतर राज्यसभेची कार्यवाही उद्या सकाळी ११ पर्यंत स्थगित करण्यात आली आहे. दोन्ही सभागृहांचे कामकाज स्थगित केल्यानंतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद भवन परिसरात जोरदार घोषणाबाजी करत अदाणी यांच्याबाबतच्या मुद्द्यांवर सरकारकडून उत्तराची मागणी केली.

यापूर्वी आज सकाळ अदाणी मुद्द्यावरून संसदेच्या संकुलात विरोधकांनी निदर्शने केली. यावेळी त्यांनी खांद्याला एक काळी पिशवी अडकवली होती, ज्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदाणी यांची व्यंगचित्रे छापली होती. तसेच यावर मोदी-अदाणी भाई-भाई असे लिहिले होते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका गांधीयांच्यासह काँग्रेस, द्रमुक, डावे आणि इतर पक्षांच्या खासदारांनी मकर द्वारसमोर ही निदर्शने केली.

# मोफत रेशन वाटण्यापेक्षा रोजगार निर्मितीवर लक्ष द्या; सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून मोफत रेशन वाटण्यासंबंधी महत्त्वाची टिप्पणी करण्यात आली आहे सर्वोच्च न्यायालयात सोमवारी अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत अन्न पुरवठा करण्यासंबंधी एका प्रकरणावर सुनावणी घेण्यात आली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारने गरीबांना फक्त मोफत रेशन देत राहण्यापेक्षा रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रीत करण्याचे आवाहन केले.

न्यायालय म्हणाले की, इतक्या मोठ्या प्रमाणात रेशन वाटण्याची पद्धत अशीच सुरू राहिल्यास राज्य सरकारे तुष्टीकरणासाठी लोकांना रेशन कार्डचे वाटप करतच राहतील, कारण त्यांना ठाऊक आहे की या लोकांना धान्य पुरवण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. जर राज्यांना मोफत रेशन पुरवठा करण्यास सांगितले तर बहुतांश राज्य निधीच्या कमतरततेमुळे आम्ही करू शकणार नाहीत असे सांगतील, म्हणून सरकारचे लक्ष्य रोजगार निर्मिती हे असले पाहिजे, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. राज्य जर रेशन कार्डचे वाटप करणे सुरूच ठेवणार असतील तर त्यांना रेशनचे पैसे द्यायला लावले पाहिजेत का? असा प्रश्न देखील सर्वोच्च न्यायालयाने यावेळी उपस्थित केला. केंद्र सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, सरकार राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत गहू, तांदूळ आणि याच्यासह इतर जीवनावश्यक वस्तूंच्या स्वरुपात ८० कोटी गरीब लोकांना रेशन पुरवते. मात्र यावर याचिकाकर्ते वकील प्रशांत भूषण यांनी सांगितले की, असे असले तरी या योजनेतून २ ते ३ कोटी लोक वंचित राहतात. स्थलांतरित कामगारांना सहन कराव्या लागणार्या अडचणी आणि त्यांच्या वाईट परिस्थितीसंबंधी याचिकेवर न्यायालयात सुनावणी सुरू होती. ज्यामध्ये न्यायालयाने यापूर्वी जे रेशन कार्डसाठी पात्र आहेत त्यांना १९ नोव्हेंबर २०२४ पूर्वी रेशन कार्ड द्यावेत असा निर्णय दिला होता. सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान एसजी मेहता आणि याचिकाकर्ते प्रशांत भूषण यांच्या शाब्दिक चकमक झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान कोर्टाने या प्रकरणाची सुनावणी ८ जानेवारी २०२५ पर्यंत पुढे ढकलली आहे.

# सोलापुरात बेवारस पुरुष जातीचे आढळले अर्भक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (प्रतिनिधी) सोलापूर शहरातील रुपाभवानी मंदिर जवळीत विद्युत कार्यालय शेजारील नाल्याच्या कोपर्यात बेवारस मृत पुरुष जातीचे अर्भक आढळले.या नवजात अर्भकाच्या पोटाच्या खालील भागाचे कुत्र्यांनी लचके तोडले.मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी दुपारी एक ते दोन वाजण्याच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार,रुपाभवानी परिसरात बांधकाम काम करणार्या व्यक्तीला नाल्यात अर्भकाचे लचके कुत्रे तोडताना दिसून आले.ही माहिती बांधकाम कामगाराने येथील नागरिकांना सांगितली.माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.

### नाल्यात फेकलेल्या अर्भकाचे कुत्र्यांनी तोडले लचके

या घटनेची माहिती नागरिकांनी जोडभावी पेठ पोलिसांना देताच घटनास्थळी पोलिसांचे पथक दाखल झाले.त्यानंतर पोलिसांनी नवजात अर्भकाला जखमी व बेशुद्ध अवस्थते उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता, डॉक्टरांनी तपासून उपचारापूर्वीच मयत झाल्याने डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. पोलिसांकडून त्या परिसरातील सीसीसीटीव्ही फुटेज तपासणी करण्यात येत आहे.यामध्ये अर्भक कोणी आणून टाकले.याचा तपास आता पोलिस युद्ध पातळीवर करीत आहेत.आज अर्भकाचे शवविच्छेदन होणार असून,त्यानंतर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पैकेकरी हे करीत आहेत.

हे वाहत्या पाण्याच्या कोपर्यात नवजात अर्भक आढळून आले.हे अर्भक अंदाजे दोन ते तीन दिवसाचे असावे असा अंदाज डॉक्टरांनी वर्तविला आहे.नवजात अर्भकाचे लचके कुत्रे तोडताना आढळून आले. या घटनेची माहिती परिसरात कळताच अर्भक पाण्यासाठी महिला, नागरिकांनी गर्दी केली होती तर निपचित पडलेले अर्भक पाहून सर्वांनी हळूहळू व्यक्त केली.

# राज्यात गारठा वाढला; दोन दिवसात पारा आणखी खाली येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरात असलेले कोरडे वातावरण आणि उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे राज्यात थंडी परतली आहे. उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान आठ अंश सेल्सिअसवर आल्यामुळे उत्तर महाराष्ट्रात गारठा वाढला आहे. पुढील दोन दिवसांत मध्य महाराष्ट्रातही पारा खाली उतरण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, समुद्रसपाटीपासून साडेबारा किलोमीटर उंचापासून अति थंड वारे (जेट स्ट्रीम) वाहत आहे. परिणामी उत्तर भारतातून पश्चिम मध्य प्रदेशापर्यंत थंडीची लाट पोहचली आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक या चार जिल्ह्यांत पहाटेच्या किमान तापमानाचा पारा सरासरीपेक्षा ३ ते ४ अंश सेल्सिअसने घसरून ८ ते ९ अंशांपर्यंत पोहचला आहे. त्यामुळे नंदुरबार, धुळे जिल्ह्यांच्या काही भागात पहाटेचे तापमान दवांक बिंदूपर्यंत पोहचले आहे. उत्तर महाराष्ट्र वगळता सध्या महाराष्ट्रातील पहाटेचे किमान व दुपारचे कमाल तापमान सरासरी इतकेच आहे. उत्तरेत थंडी लाट आल्यामुळे आणि पश्चिमी झंझावात सक्रीय राहण्याची शक्यता असल्यामुळे बुधवारपर्यंत (१८ डिसेंबर) थंडी कायम राहण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसांत मध्य महाराष्ट्रातही किमान तापमान नऊ अंश सेल्सिअसपर्यंत खाली येण्याचा अंदाज आहे, अशी माहिती निवृत्त हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

राज्यात मंगळवारी जळगावात ८.० अंश सेल्सिअस इतक्या सर्वांत कमी किमान तापमानाची नोंद झाली आहे. त्या खालोखाल नाशिक ९.४, नगर ११.७, पुणे १२.३, महाबळेश्वर १३.२, छत्रपती संभाजीनगर १२.२, परभणी १२.५, अकोला ११.८, अमरावती १२.३, बुलढाणा ११.४, नागपूर १२.०, वर्धा १२.४, कुलाबा २०.८, सातांक्रुज १८.० आणि डहाणूत १४.१ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे.

### भाविकांना अधिकाधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने शिर्डी व शेगाव देवस्थानचा अभ्यास दौरा

### सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर

# तिरुपती देवस्थानच्या धर्तीवर टिसीएस कंपनीकडून टोकण दर्शन प्रणालीच्या प्रस्तावास मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या भाविकांचे सुलभ व वेळेत दर्शन व्हावे यासाठी तिरूपती व शिर्डी देवस्थानच्या धर्तीवर टोकण दर्शन पध्दती राबविण्यासाठी आवश्यक संगणक प्रणाली विकसित करून देण्याबाबत टिसीएस कंपनीला प्रस्ताव देण्यात आला होता. त्यावर सदर कंपनीने मोफत संगणक प्रणाली विकसित करून देण्याचा प्रस्ताव मंजुर केला असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे मंदिर समितीची सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक संपन्न झाली. बैठकीस मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड.माधवी निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा व मंदीर समितीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्वार कामाचा आढावा घेऊन कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण करावीत अशा सुचना पुरातत्व विभाग व संबधित ठेकेदारास देण्यात आल्या. तसेच तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर मालमत्ता अधिकारी नियुक्त करणे, श्री क्षेत्र आळंदी येथे मंदिर समितीसाठी जागा उपलब्ध करून घेणे, सन २०२५ मधील श्रींच्या पुजा ऑनलाईन बुकींग करणे, रक्षक सिक्युरिटी कंपनी विषयी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना अंतिम नोटीस देणे, मंदिरातील निर्माल्यापासून धुप - अगरबत्ती तयार करणेबाबत थर्ड वेव्ह टेक्नॉलॉजीज, पुणे यांनी कोणत्याही स्वरूपाची कार्यावाही न केल्याने प्रस्ताव रद्द करून ऋषिकेश भट्टड, पंढरपूर यांचा प्रस्ताव योग्य त्या अटी व शर्तीवर मंजुरी देण्यात आली आहे. बैठकीत आदी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

तसेच अनंत अरूण माळवदकर, गुरूदत्त अभिमन्यू क्षिरसागर, संकेत अशोक कोले, स्नेहा अमोल वाडेकर इत्यादी कर्मचा-यांना अनुकंपा तत्वावर मंदिर समितीमध्ये नोकरी देऊन नियुक्ती पत्रे वाटप करण्यात आली. त्याचबरोबर वेदांता व व्हिडीओकॉन भक्तनिवास येथील उपहारगृहाचे भूमिपूजन करण्यात आले व दैनंदिनी २०२५ चे प्रकाशन देखील करण्यात आले. तसेच कार्यालयीन कामकाज गतीमान करण्याच्या दृष्टीने विविध संगणक प्रणाल्या टिसीएस कंपनीकडून मोफत उपलब्ध करून घेणे व महाराष्ट्र राज्यातील शिर्डी व शेगांव देवस्थाने ही प्रसिध्द देवस्थाने आहेत. या देवस्थान मधील कार्यालयीन कामकाज, कामकाजासाठी केलेल्या अत्याधुनिक साधनांचा वापर, भाविकांना देण्यात येणा-या सेवा सुविधांची माहिती घेण्यासाठी मंदिर समितीच्या आस्थापनेवरील अधिकारी, पदाधिकारी व वरिष्ठ कर्मचा-यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात येणार असल्याचे यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

बुधवार दि. ११ डिसेंबर २०२४ 

## संपादकीय....

### अविश्वास प्रस्ताव

सध्या सुरू असलेले संसदेचे अधिवेशन विविध मुद्द्यांनी गाजत आहेत. अशात राज्यसभेचे सभापती जयदीप धनखड यांच्याविरोधात विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्ताव आणला आहे. दरम्यान काँग्रेसचे नेते कपिल सिब्बल यांनी एक्सवर नुकतीच एक पोस्ट केली आहे. यामध्ये सिब्बल यांनी सांगितेल आहे की, इंडिया आघाडीतील पक्षांनी राज्यसभेचे सभापती जयदीप धनखड यांच्याविरोधात राज्यसभेच्या मुख्य सचिवांकडे अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखर यांच्या विरोधात विरोधकांनी मंगळवारी अविश्वास प्रस्ताव आणला आणि भारताच्या संसदीय इतिहासातील अशा प्रकारची ही पहिलीच कारवाई ठरली. या अविश्वास प्रस्तावावर सुमारे ७० खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यात काँग्रेस, बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस, अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष, अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्ष, तामिळनाडूचा द्रमुक आणि लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाच्या सदस्यांचा समावेश आहे. राज्यसभेतील संख्याबळ पाहता हा प्रस्ताव नामंजूर होण्याची शक्यता आहे. मात्र विरोधकांना सभापती त्यांना सभागृहात बोलण्याची संधी देत नाहीत, हे सिद्ध करायचे आहे. आज दोन्ही सभागृहांचे कामकाज चालू झाले तेव्हा सत्ताधाऱ्यांनी जॉर्ज सोरोस यांचा तर विरोधीपक्षांनी उद्योगपती गौतम अदाणी यांचा मुद्दा उचलून धरला आहे. दोन्ही सभागृहांचे कामकाज स्थगित केल्यानंतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद भवन परिसरात जोरदार घोषणाबाजी करत अदाणी यांच्याबाबतच्या मुद्द्यांवर सरकारकडून उत्तराची मागणी केली.

# बांगलादेशातील अल्पसंख्यांक हिंदूंच्या मानवाधिकार, मालमत्ता आणि जिविताचे संरक्षण करण्याची मागणी

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे सकल हिंदू समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : मागील काही कालावधी पासून महिन्यांपासून बांगलादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदूच्या मानवधिकार, मालमत्ता आणि जिवितांचे हनन झाल्याचे प्रसारमाध्यमांतून निदर्शनास येते. तसेच बांगलादेशात मागील काही महिन्यांमध्ये हिंदू मंदिरावरील हल्ले, तोडफोड, हिंदू धर्मियातील आबालवृद्ध आणि महिलांवर झालेले अमानवीय अत्याचार आणि त्यात सातत्याने होत असलेली वाढ हि गंभीर बाब असून मानवाधिकारांचे हनन करणाऱ्या वृत्तींना रोखण्यासाठी तत्काळ कार्यवाही करावी अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना केली आहे.



पुढे निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, शेजारील बांगला देशात केलेल्या अल्पसंख्यांक हिंदू समाजावरील असहिष्णू आणि अमानवीय अत्याचारामुळे बांगलादेशातील हिंदू समूदाय हा प्रचंड त्रस्त आणि व्यथित झाला आहे. त्यामुळे तेथील हिंदू धार्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. सदरील प्रकाराकडे बांगलादेश शासनाने त्याकडे जीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. तेथील हिंदू समाजाचे चिन्यय कृष्ण महाराज यांना खोट्या गुन्हयात जबरदस्तीने अडकवून हिंसात्मक पध्दतीने केलेली अटक ही निंदनीय आणि अशोभनीय आहे. तसेच चिन्मय कृष्ण महाराजांना चित्तागोग मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले तीथे त्यांना योग्य तो औषधोपचार आणि भोजन मिळण्यास जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. सदर प्रकार जागतिक स्तरावर मान्य अशा मानवाधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या आहेत. याच कारागृहात विविध कट्टरतावादी मुस्लिम दहशतवादी संघटनेशी संबंधित गुन्हेगार आहेत. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सदरील घटनेची गांभीर्यपूर्वक विचार करून तेथील हिंदूंना संरक्षण द्यावे अशा मागणीचे निवेदन लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्फत देण्यात आले. यावेळी लोहा तालुक्यातील सकल हिंदू समाज बांधवांची बहुसंख्येने उपस्थितीती होती. निवेदनावर सकल हिंदू समाजाचे युवराज पाटील शिंदे, आनंद कदम, हरिश देशमुख, रामभाऊ मोरे, दत्ता बोरलेपवार, विनायक कोपनर, रोहित देशमुख, भारत कल्याणकर, योगी महाराज, शिवाजी महाराज, खंडू पळसे, बालाजी संगेवार, कृष्णा बंकवाड, ज्ञानेश्वर भालेराव, मोहन गहेरवार, हरीपंत कनकदंडे, मारोती तेलंगे, नारायण इबितवार आदींसह बहुसंख्यांक समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कर्मवीर मोरे यांच्या विचार कार्याचा वसा अंगिकारा : सभापती क्षीरसागर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सत्यशोधक विचारांची पाश्र्वभूमी स्वीकारीत बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाठी मराठा विद्या प्रसारक समाजाची स्थापना करण्यात कर्म. गणपत दादा मोरे यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. अज्ञान, अंधश्रद्धा आणि गरीबी दूर होईल, यासाठी शिक्षण हाच प्रमुख पर्याय आहे. याची जाणीव समाजाला होण्यासाठी जलशांच्या मध्यमातून प्रबोधन केले. त्यांच्या कार्यामुळेच आज बहुजन समाजाचा विकास होत आहे. त्यांचे कार्य आणि विचार काळाच्या ओघात पुढे नेण्यासाठी सर्वांच्या प्रयत्नांची गरज असून त्यांचा वारसा जतन केल्यास समाज आधिक समृद्ध होईल '' असा विश्वास मविप्र समाजाचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी व्यक्त केला. कर्म गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात आयोजित कर्मवीर गणपत दादा मोरे जयंती प्रसंगी अध्यक्षीय मनोगत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, शिक्षणाधिकारी डॉ.अजित मोरे ,प्रमुख वक्ते डॉ.नारायण पाटील,डॉ.उत्तमराव डेर्ले, प्राचार्य प्रोफे (डॉ.) सुरेश जाधव व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला आईच्या नावे एक वृक्ष या मोहिमेच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व एन.सी.सी यांच्या संयुक्त विद्यमाने १०० वृक्षांचे रोपण मान्यवरांच्या शुभहस्ते केले. यात सर्व प्राध्यापक व सेवक वर्गाने ३० हजार रु. वर्गणी जमा करून हा उपक्रम राबवला असून. कर्म. गणपत दादा मोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

या वेळी प्रमुख वक्ते डॉ.नारायण पाटील म्हणाले.'' कर्मवीरांचे विचार,संस्कार आणि कार्य समाजाच्या स्मरणात राहण्यासाठी जंयती पुण्यतिथी व त्यांचे स्मरण करणे आवश्यक आहे.येथील व्यवस्थेने बहुजन समाजाला जे हक्क नाकारले होते ते सर्व हक्क मिळविण्यासाठी कर्मवीरांनी आयुष्यभर प्रयत्न केले. महात्मा फुले, शाहु महाराज व सत्यशोधकी परिवर्तनवादी विचार जलसा माध्यमातून समाजात रुजवण्याचा प्रयत्न कर्म गणपत दादांनी केला. त्यांच्या कार्यामुळे आज परिवर्तनाची नवी दिशा मिळाली. त्यामुळे त्यांचे कार्य आणि विचार आपण कायम स्मरणात ठेवावे.''असे आहवान केले असून शिक्षणाधिकारी डॉ.अजित मोरे म्हणाले,'' गणपत दादांनी जे समाजप्रबोधन केले,त्यात शिक्षण हा मानवी विकासाचा पाया मानला, गणपतदादांचे जीवन चरित्र अनेक प्रबोधनात्मक उदाहरणातून त्यांनी श्रोत्यांसमोर विशद करत त्यांच्या मूल्यांचा सर्वांनी अवलंब करावा असे प्रतिपादन केले.

प्रास्तविकात प्राचार्य प्रोफे(डॉ.) सुरेश जाधव यांनी कर्म. गणपत दादा मोरे यांचे निफाड महाविद्यालयाला दिलेले नाव आज शैक्षणिक,सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयाच्या होणाऱ्या प्रगतीमुळे सार्थ ठरले आहे. असा विश्वास व्यक्त केला

या प्रसगी माधवराव गीते,अशोक कुंदे,जानकीराम धारराव,भाऊसाहेब कापसे, यशवंत वडघुले,बाळासाहेब सानप,पत्रकार राहुल दवते, रामनाथ धारराव,तुषार खालकर,सुरज कुंदे, प्रल्हाद मिस्त्री,अभय वडघुले, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीततेसाठी सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,सेवक वृंद यांनी परिश्रम घेतले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संयोजन डॉ.महेश बनकर यांनी केले तर आभार डॉ. सुसान लॉरेन्सिया यांनी मानले.

# भव्य नागरी सत्कार समारंभ, नॅशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड पुरस्कारसाठी प्रस्ताव पाठवण्याचा आवाहन : तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/राहुल साबळे : तथागत बहुउद्देशीय संस्था, मेहकर द्वारे आयोजित राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहायता महिला बचत गट, तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील कर्तृत्ववान बंधू व भगिनींना, तसेच युवक युवतींनचा नँशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार असल्याची घोषणा तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी केली आहे. आपला प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख. १०/जानेवारी २०२५ अशी आहे. नँशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड म्हणून पुरस्कार देण्यात येत आहे. ह्या पुरस्काराचा संदर्भ खालील प्रमाणे आसा आहे की, नेतृत्व गुणाबदल देण्यात येणारा पुरस्कार हा पुरस्कार त्या व्यक्तीसाठी आहे. ज्यात प्रामाणिक पणा, सचोटी, आत्मीयता, हे गुण नियमितपणे दिसून येतात शिवाय या व्यक्तीचं संवाद कौशल्य, श्रवण कौशल्य, तसंच तो परस्पर नातेसंबंध किती कौशल्याने हाताळतो लोकांशी कसं वागतो, एक नेता ज्याने त्यांच्या लोकांना एका व्यासपिठावर गोळा केलं आहे, आशा वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या लोकांना दिला जाणारा हा पूरस्कार आहे.



आशाच महाराष्ट्रातील विवीध क्षेत्रामध्ये चांगले काम करणार्या बंधू व भगिनींना, तसेच युवक युवतींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार सोहळा राबविण्यात येणार आहे. नँशनल पिपल लीडरशीप अँवॉर्ड या पुरस्काराचे गावपातळीवर मेहकर येथे वितरण होणार आहे. यामध्ये सन्मानपत्र, सन्मानचिन्ह ट्राफी, मेडल, पंचरंगीदुपट्टा, असे या पुरस्काराचे स्वरूप ठेवण्यात आले आहे. यासाठी इच्छुकांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे आशा गुणीजनांना पुरस्कार वितरण व जेष्ठ नागरिक, माजी सैनिक यांचा भव्य नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपला प्रस्ताव तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांच्या संपर्क कार्यालय मिलिंद नगर वार्ड नं १९ मेहकर ता. मेहकर जिल्हा बुलढाणा येथे यांच्याकडे सादर करावयाचा आहे. किंवा मो. ९९७०४६७१४१, ९८८११९९८५२ या संपर्क नंबरवर पाठवून संपर्क साधावा. त्या अनुषंगाने सामाजिक ल राजकिय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान सामाजिक व राजकिय क्षेत्रातील बंधू व भगिनींना, तसेच युवक युवतींना आपला कार्य अहवाल सादर करण्याचे आव्हान तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांनी केले आहे.



# प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्रकार संवाद यात्रेची माहिती पुस्तिका भेट

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे विधानसभा निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन करून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेची माहिती पुस्तिका भेट दिली. पत्रकारांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करून आगामी काळात सरकारच्या माध्यमातून मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी पत्रकार संघाचे मंत्रालय संपर्कप्रमुख नितीन जाधव उपस्थित होते.

**या आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहणार देश-परदेशातील संशोधक**

**चारही परिषदेच्या तुलनेत यंदाच्या परिषदेला प्रचंड प्रतिसाद**


# १३ व १४ डिसेंबर रोजी स्वेरीत 'टेक्नो-सोसायटल २०२४' चे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'राज्यात तंत्रशिक्षण क्षेत्रात नवनवीन संकल्पना आणि व्यावसायिक शिक्षणातील स्वतंत्र 'पंढरपूर पॅटर्न' अमलात आणत असताना शुक्रवार, दि.१३ व शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४ या दोन दिवशी गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद 'टेक्नो-सोसायटल २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. स्कूल ऑफ लाईफ सायन्सेस, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर व स्वेरी, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा या योजनेअंतर्गत या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या पाचव्या 'टेक्नो-सोसायटल २०२४' परिषदेसाठी सिंगापूर मधील एनयुएसचे डॉ.प्रल्हाद वडक्केपात व मलेशियातील हेल्फ विद्यापीठातील प्रा.डॉ. आर. लोगेश्वरन हे प्रमुख उदघाटक म्हणून लाभलेले आहेत तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर हे अध्यक्षपद भूषविणार आहेत.

> **या लक्षवेधी आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी सर्व समित्या स्वतंत्रपणे स्थापन झाल्या असून प्रत्येक समिती आपली जबाबदारी पार पडत आहेत. बाहेरून आलेल्या पाहुण्यांच्या स्वागतापासून समारोप पर्यंतच्या प्रत्येक बाबीवर बारीक लक्ष असणार आहे. यासाठी काहीही कमी पडणार नाही याची काळजी सर्व सामित्यामधील सदस्य घेत आहेत. मागील चारही परिषदेप्रमाणे ही 'टेक्नो-सोसायटल २०२४' आंतरराष्ट्रीय परिषद देखील यशस्वी होईल.**
>
> **-डॉ.बी.पी. रोंगे** (प्राचार्य स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गोपाळपूर, )

'टेक्नो-सोसायटल- २०२४' या परिषदेमध्ये पाणी, ऊर्जा, वाहतूक, गृहनिर्माण आणि स्वच्छता यासाठी प्रगत तंत्रज्ञान जैव आणि सामाजिक अनुप्रयोगांसाठी मेकाट्रॉनिक्स, मायक्रो-नॅनो संबंधित, रासायनिक आणि भौतिक प्रक्रिया, व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी ग्रामीण आणि कृषी आधारित तंत्रज्ञान, उपयोज्य पर्यावरण किंवा आरोग्य काळजी संबंधित तंत्रज्ञान, शाश्वत तंत्रज्ञानासाठी समग्र दृष्टीकोन, आयसीटी आधारित सामाजिक तंत्रज्ञान आणि लॅब-स्तरीय प्रगत सामाजिक तंत्रज्ञान सेन्सर, प्रतिमा आणि डेटा-चलित सामाजिक तंत्रज्ञान, ग्रामीण आणि कृषी रोजगार निर्मितीसाठी तंत्रज्ञान, सामाजिक अनुप्रयोगांसाठी उत्पादन आणि फॅब्रिकेशन प्रक्रिया, न्यूट्रास्युटिकल्स आणि पारंपारिक औषधे, हेल्थ केअरमधील कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रणाली, नवीन औषध वितरण प्रणाली, जीवशास्त्र आणि लस विकास आणि बायोसेन्सर, अक्षय ऊर्जा स्रोत, वाणिज्य आणि व्यवस्थापनातील अलीकडील ट्रेंड आणि आयुर्वेद तसेच




संशोधनावर प्रकाश टाकणार आहेत. या परिषदेत 'कि नोट स्पीकर' म्हणून कन्नूर (केरळ) मधील विनोय विष्णू वडक्केपात, गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कराडचे प्राचार्य डॉ. विनायक कुलकर्णी, आयआयटी बॉम्बेचे डॉ. परमेश्वर उदमले, गुरुनानक देव कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, बिदर (कर्नाटक) चे प्रा. वीरेंद्र डाकुलगी, कृषी विद्यापीठ, अहिल्यानगरचे माजी प्राचार्य डॉ. डी. एस. गोरंटीवार, आयआयटी जोधपुरच्या डॉ. साक्षी धानेकर, आयआयटी बॉम्बेचे नरेंद्र शहा, पू.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा तर ऑनलाईन माध्यमातून यूएस मधील डॉ.विशाल धमगाये, अमेरिकेमधून जॉर्ज मेशन विद्यापीठाच्या डॉ. सपना गंभीर, ताश्कंद इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी, उझबेकिस्थानचे डॉ. बोथीर उस्मोनोव्ह, देला सॅली विद्यापीठ फिलिपिन्सचे लॉव सायमन चाटीमबंग, दुबई मधून अमेटी विद्यापीठातील डॉ. व्यंकट रेड्डी पोलुरू, आयआयटी जम्मु चे डॉ. विजयकुमार पाल, मलेशियातील जालन विद्यापिठाचे डॉ. यीप किम हु, आयआयटी भुवनेश्वरचे डॉ. गौरव बरतार्या यांच्यासह स्वेरीचे डॉ. प्रशांत पवार, सहसमन्वयक डॉ. व्ही. बी. पाटील, प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, तज्ञ संशोधक व अभ्यासक सहभागी होणार आहेत. 'टेक्नो-सोसायटल' या आंतरराष्ट्रीय परिषदेचा फायदा समाजाच्या उद्धारासाठी करायचा यासाठी 'टेक्नो- सोसायटल' या परिषदेची खरी सुरुवात झाली. यंदा होणाऱ्या परिषदेसाठी जवळपास ४६० प्राध्यापक व संशोधकांनी नोंदणी केली असून जवळपास १०५० प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत. यापूर्वी सन २०१६, २०१८, २०२० व २०२२ या चार वर्षी 'टेक्नो-सोसायटल' या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून स्वेरीमध्ये समाजाशी निगडित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी आणि ग्रामीण भागातील तंत्रज्ञानाला चालना मिळण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिसंवाद आयोजित केले होते. 'टेक्नो- सोसायटल २०१६', 'टेक्नो-सोसायटल २०१८' नंतर तिसरी आंतराष्ट्रीय परिषद 'टेक्नो-सोसायटल २०२०' ही जागतिक कोरोना महामारीमुळे ऑनलाईन पद्धतीने झाली तर चौथी 'टेक्नो-सोसायटल २०२२' ऑफलाईन प्रकारे पार पडली. यातील संशोधनपर लेख स्प्रींजर या आंतरराष्ट्रीय प्रकाशनाच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आले आहेत. टेक्नो- सोसायटल २०२४' ही आंतरराष्ट्रीय परिषद स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांच्या नेतृत्वाखाली होत असून परिषदेचे समन्वयक म्हणून संशोधन अधिष्ठाता डॉ.अमरजित केने हे काम पहात आहेत. मागील चारही परिषदेच्या तुलनेत यंदाच्या परिषदेला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी स्वेरी परिवारातील सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पै.मारुती खोबरे गुरुजी यांचे निधन



वागदरी : धाराशिव जिल्हा कुस्तीगीर परिषदेचे सचिव,लातूर शिक्षण बोर्डाचे माजी सदस्य, अणदूर ता.तुळजापूर येथील जवाहर विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक पै.मारूती मैलारी खोबरे (गुरुजी) (वय ७८) यांचे रविवारी (दि.८) रोजी सायंकाळी ह्दयविकाराच्या धक्याने निधन झाले आहे. ते जवाहर विद्यालय अणदूर येथे शारीरिक शिक्षक म्हणून प्रदिर्घ काळ सेवा करून शेवटी मुख्याध्यापक म्हणून सेवा निवृत्त झाले होते.मैदानी खेळाची त्यांना आवडत होती त्यातल्या त्यात कुस्ती खेळ हा त्यांच्या खुप आवडीचा खेळ होता.त्यानी आपल्या हायातीत अनेक पैलवान घडविले. जवाहर विद्यालयातील विद्यार्थ्यांना दर वर्षी तालुका, जिल्हा, आणि राज्य स्तरावर कुस्ती स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रवृत्त करित असत. एक उत्कृष्ट मल्ल पंच म्हणून त्यांची सर्वत्र ख्याती होती. ते धाराशिव जिल्हा कुस्तीगीर परिषदेचे सचिव होते. नुकतच त्यांना पैलवान रेवाप्पा सोनकांबळे क्रीडा प्रतिष्ठान नळदुर्ग ता.तुळजापूर च्या वतीने पै.रेवाप्पा सोनकांबळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ चांदीची गदा देवून राज्यस्तरीय उत्कृष्ट मल्ल पंच पुरस्काराने त् सन्मानीत करण्यात आले होते.पै.मारुती खोबरे गुरुजी यांच्या निधनाने एक उत्कृष्ट मल्ल पंच हरपला अशा भावपूर्ण शब्दांत उपस्थितानी त्याना श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पश्चात,पत्नी, दोन मुली,एक मुलगा असा परिवार असून सोलापूर येथील डॉ. शिवशंकर खोबरे यांचे ते वडील होत.

# सकल हिंदू समाजातर्फे निफाड शहरात कडकडीत बंद

## पिंपळगाव येथे घडलेल्या घटनेचा मूक मोर्चाने केला निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथे हिंदू तरुणावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ तसेच शेजारील राष्ट्र बांगलादेशातील हिंदू धर्मस्थळे व हिंदू कुटुंबीयांवर केले जाणारे अत्याचार ,प्राणघात खाल्ले, त्यांच्या मालमत्तांचे नुकसान करून त्यांना देशातून पळवून लावण्यासाठी केले जाणारे प्रयत्न या घडणाऱ्या घटनांकडे सर्व देश वाशियांचे, जगाचे आणि मानव अधिकार आयोगाचे लक्ष वेधण्यासाठी हिंदू धर्मियांच्या रक्षणार्थ निफाड शहरातील सकल हिंदू समाजातर्फे दिनांक १० डिसेंबर रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला, असून संपूर्ण शहरातून मूक मोर्चाचे आयोजन करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.






**सध्या जे काही अत्याचार घडतात हे अत्याचार जे कोणी समाजकंटक करत असतील त्यांच्यावर खऱ्या अर्थाने कारवाई झाली पाहिजे, बांगला देशामध्ये जे घडतंय याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर कारवाई झाली पाहिजे,अशा ज्या घटना घडतात या परत कधीही घडू नये कोणावरही अत्याचार होऊ नये, या हिंदुस्थानामध्ये सर्व धर्मीय लोक एकत्र राहत असून हिंदुस्थानात अशे अत्याचार होत नाही परंतु बांगलादेशात जे हिंदुवर अत्याचार घडतात ते निषेधार्थ असून याचा आम्ही निषेध करतो.**

**अनिल पा कुंदे, उपनगराध्यक्ष निफाड**

सदरचा मूक मोर्चा निफाड शहरातून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सकाळी दहा वाजता सुरू होऊन समारोप ही छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आला निफाड शहरातील तमाम हिंदू बंधू भगिनींनी सदर घटनेकडे सरकारचे लक्ष जावे यासाठी हिंदू समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

याप्रसंगी सकल हिंदू समाजाच्या वतीने तहसीलदार विशाल नाईकवाडे तसेच पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना निवेदन देण्यात आले . याप्रसंगी निफाड पोलिसांच्या वतीने बंदोबस्त देण्यात आला होता, मोर्चाची राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली , यावेळी सकल हिंदू समाज मोठ्या संख्येने या मूक मोर्चात सहभागी झाला होता.

## ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम जन आंदोलनास सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परंडा/ सुधाकर रणदिवे : वंचित बहुजन आघाडी च्या वतीने राज्यभरात ईव्हीएम विरोधात आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्प्याटप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारणी च्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यपाल ईव्हीएम विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड .बाळासाहेब आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीम सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.२००४ पासुन ड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात ईव्हीएम विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. ईव्हीएम च्या विरोधात न्यायालयीन लढाई सुद्धा ते लढत आहे पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मांडले आहेत.ईव्हीएम च्या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला आहे.



२४३ परंडा विधानसभा मतदारसंघात मध्ये वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परंडा शहरातील किल्ला रोड, मंडई पेठ, येथून स्वाक्षरी मोहीम राबविण्यात सुरुवात करण्यात आली. सर्व मतदारांनी या मोहिमेत सहभागी होऊन ईव्हीएम ला हद्दपार करण्यासाठी हातभार लावावा असे आव्हान वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात येत आहे. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के, परंडा शहराध्यक्ष किरण बनसोडे, महासचिव राहुल पवार, विलास जाधव, रणधीर मिसाळ, प्रफुल्ल चौथमहाल, अरुण सोनवणे,युवा अध्यक्ष रणवीर निकाळजे, युवा नेते फिरोज तांबोळी आरीफ पठाण, धनंजय चौधरी, भाऊसाहेब टकले, आधी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## नळदुर्ग येथे व्यापारी महासंघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा गावकऱ्यांकडून कडून सन्मान सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्गच्या ऐतिहासिक नगरीत व्यापारी वर्गाचे पुर्वी पासुनच खुप मोठ्या प्रमाणावर संघटन कौशल्य आहे नळदुर्ग या नगरीत अनेक जाती धर्माचे लोक राहातात परंतू संघटन बांधणी खुप महत्वची आसते प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी संघटनात्मक बांधणी करूनच व्यापारी महासंघात नविन आणि तरुण युवकानी पुढाकार घेतला आसुन या व्यापारी महासंघाची प्रभावी पणे अंमलबजावणी करावयाची आहे म्हणून नव युवकानी या व्यापारी महासंघात उडी घेतली आहे . या सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा शिवम कॉम्प्यूटर यूजिकेशनच्या वतीने सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता .

**नळदुर्गच्या ऐतिहासिक शहरात व्यापारी वर्गात यूवकांनी घेतली उडी**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यापारी मंडळाचे माजी अध्यक्ष मोहन नाईक हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नळदुर्ग नगरीचे जेष्ठ पत्रकार विलास येडगे , माजी नगरसेवक संजय बताले , व्यापारी महासंघाचे दयानंद स्वामी , अनिल पुदाले , मुकुंद नाईक आदिजन उपस्थित होते . नवनिर्वाचित अध्यक्ष सतीश अशोकराव पुदाले यांच्या सह सर्व पदाधिकारी यांचा शाल फेटा पुष्पहार बुके देऊन सन्मान पुर्वन सन्मान करण्यात आला

यावेळी ज्येष्ठ व्यापारी खंडेशा कोरे , माजी उपनगराध्यक्ष संजय मोरे माजी नगरसेवक सुधिर भैया हजारे , नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे , सामाजिक कार्यकर्ते संजय जाधव , डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लीश मेडीयम स्कुलचे मुख्य प्रवर्तक संस्थापक मारुती खारवे , पत्रकार उत्तम बनजगोळे , नळदुर्ग टाईम्स व लाईव्ह न्यूजचे संपादक दादासाहेब बनसोडे सोसायटीचे चेअरमन संजय बेडगे , न्हावी संघटनेचे नेते संदीप सुरवसे , राजेंद्र महाबोले , प्रकाश कासार , गणेश कुलकर्णी नितीन कुलकर्णी , विशाल डुकरे , नेते बंडोपंत कसेकर , लोकमान्य वाचनालयाचे अध्यक्ष शशिकांत पुदाले माझी आर टी ओ नंदकुमार डुकरे , सुभाष कोरे , गावातील लोकसंख्या व्यापारी व ज्येष्ठ नागरिक मित्रपरिवार उपस्थिती उपस्थिती होते खालील नवनिर्वाचित पदाधिकारी अध्यक्ष सतिश पुदाले , उपाध्यक्ष उमेश नाईक , अतुलसिंग हजारे , सचिव संतोष मुळे , कोषाध्यक्ष मुकुंद नाईक , सहसचिव मल्लीनाथ शिरगुरे , सुधिर पाटील , वैजिनाथ कोरे, गणेश किल्लेदार , मोहित कलकोटे , शंतनू डुकरे अदिजनांची निवड करण्यात आली आहे .




## सुपतगाव येथे श्रमदानातून वनराई बंधारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : महाराष्ट्र शासन कृषी विभाग कडून उमरगा तालुक्यात सध्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वनराई बंधारे बांधण्यात येत आहेत. सदर बंधारे हे श्रमदानातून बांधण्यात येत असून त्यास तांत्रिक मार्गदर्शन कृषी विभाग करताना दिसून येत आहे. अशाच संकल्पनेतून सुपतगाव येथे तालुका कृषी अधिकारी उमरगा डी.बी.रितापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत सदर कामामध्ये मंडळ कृषी अधिकारी ए.बी.पटवारी ,कृषी सहाय्यक ए.एच.भालेराव,अतुल गायकवाड,रमेश पाटील, गुडूसाहेब शेख,अमोल बलसुरे ,बाळासाहेब खंडळकर, प्रशांत जाधव, धीरज गोडबोले यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## शेकडो महिलांचा भावना घाणेकर यांच्या उपस्थित राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये प्रवेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षामध्ये तळोजा विभागातील असंख्य महिला भगिनींनी पक्षामध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे युवा नेते रमझान शेख यांच्या माध्यमातून हा पक्षप्रवेश सोहळा महिला प्रदेश सरचिटणीस भावनाताई घाणेकर यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी पनवेल महिला जिल्हाध्यक्ष राजश्रीताई कदम, खारघर शहराध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, ग्राहक संरक्षण जिल्हाध्यक्ष कृष्णा मर्डेकर , जिल्हा संघटक अमीर शाह मीरू, तुफेल खान जिल्हा अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग , खारघर शहर उपाध्यक्ष प्रवीण वारे , युवा कार्यकर्ते समीर शेख, मिराज शेख, इसराइल शेख आदी उपस्थित होते.

यावेळी तरन्नुम सय्यद समद अली यांना महिला जिल्हा कार्याध्यक्ष, शाहीन खान यांना महिला जिल्हा सरचिटणीस, रुक्सार शेख यांना महिला तलोजा शहर फेस २ अध्यक्ष पदांचा कारभार सुपूर्त करण्यात आला. यावेळी इतरही कार्यकर्त्यांना पक्षाच्या अनेक जबाबदाऱ्या देण्यात आल्या.

**फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंट (फॅम) यांचा स्तुत्य उपक्रम**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन**

# ‘एक वही एक पेन’ अभियानातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे हजारो नागरिक बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी जात असतात. विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून डॉ बाबासाहेबांना अभिवादन केले. दरवर्षी अनुयायी हार-फुले वाहून, मेणबत्ती प्रज्वलित करुन आदरांजली वाहतात. यामुळे मोठ्या प्रमाणात हार-फुले वाहिले जातात. हे हार-फुले दुसऱ्या दिवशी कुठल्याही उपयोगाचे न राहता नाशवंत होतात. ही गोष्ट आर्थिक व पर्यावरणाच्या दृष्टीने चिंताजनक आहे. याचे गांभीर्य लक्षात घेता फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंट (फॅम ) यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर ,शिवाजी पार्क मा.साहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याशेजारी येथे 'एक वही एक पेन' सामाजिक उपक्रम राबवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन करण्यात आले. तर

### या उपक्रमाचे विशेष म्हणजे

**सदर संघटनेत इंजिनियर, शासकीय कर्मचारी, बँक कर्मचारी इत्यादी सदस्य आहेत परंतु आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो या भावनेने कार्यालयात सुट्टी काढून पाच आणि सहा डिसेंबर रोजी आवर्जून उपस्थित असतात. प्राप्त झालेले साहित्य आम्ही गरजु विद्यार्थ्यांपर्यंत पोचवू. त्यांच्या शिक्षणाला तुमच्या वतीने हातभार लावू. विद्यार्थी शिक्षित होतील. आयुष्यात मोठ्या पदांवर विराजमान होतील. व बाबासाहेबांचे उच्चशिक्षित समाजाचे स्वप्न पूर्ण होतील असे यावेळी फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंट (फॅम) मधील पदाधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले.**

महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यातून, तालुक्यातून तसेच खेडोपाड्यातून एक वही एक पेन हा उपक्रम राबविण्यात आला. 'एक वही एक पेन' या सामाजिक उपक्रमा अंतर्गत नागरिकांनी आपल्या सहभागातून अनेक वह्या, पेन अर्पण करून सामाजिक बांधिलकी जपत डॉ . बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन केले. जमा झालेले शैक्षणिक साहित्य ग्रामीण भागातील गरीब,गरजू,आदिवासी पाड्यात विद्यार्थ्यांना ३ जानेवारी सावित्रीबाई फुले जयंतनिमित्त व १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त वाटप करण्यात येणार असल्याचे फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंट (फॅम ) पदाधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले.

विविध भागात शैक्षणिक सुविधा अभावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता असते. एकीकडे अभिवादनपर हार, फुलांचा खच पडतो तर दुसरीकडे आपले उद्याचे देशाचे भविष्य कोमेजून जाताना अत्यंत वेदनादायक असल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी 'एक वही एक पेन' सामाजिक उपक्रम राबवून अनोखे अभिवादन करण्यात आले असून महामानवाला आदरांजली देऊया, किमान एक वही आणि एक पेन वंचितांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प यावेळी फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंट (फॅम) यांच्या वतीने करण्यात आला. या सामाजिक उपक्रमाबद्दल सर्वत्र



ठिकाणी चर्चा होत असून या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे.

# माढा मतदारसंघात परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार : आ. अभिजीत पाटील

## निवडून आलेले रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुंबई येथील तीन दिवसीय विधिमंडळाच्या अधिवेशनानंतर माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी स्वराज्याची राजधानी गाठली आणि छत्रपतींच्या गादीसमोर नतमस्तक झाले. निवडून आल्यानंतर रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार अभिजीत पाटील हे आहेत.

रायगडाच्या पावन स्थळावर छत्रपतींचा राज्याभिषेक झाला होता. याच ठिकाणी स्वराज्याचा संकल्प पूर्ण केला होता. या ठिकाणी छत्रपतींचे अनेक वर्ष वास्तव होते. या पवित्र ठिकाणी जाऊन आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी अभिजीत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की छत्रपतींनी हजारो मावळे घडवले आणि स्वराज्याची संकल्पना रुजवली. त्यांच्या प्रेरणेने पुढील पिढ्या घडल्या मराठा साम्राज्याने बलाढ्य शक्तींना परास्त करत अटकेपार झेंडा रोवला. संपूर्ण महाराष्ट्र स्वराज्याच्या आदर्श संकल्पनांवर उभा राहिला आहे.

**आमदार अभिजीत पाटील यांनी घेतले रायगडावर छत्रपती शिवरायांचे दर्शन आणि वंशज यांची भेट**

मला देखील माढा विधानसभेची मिळालेली जबाबदारी एक मावळा म्हणून पूर्ण करायची आहे.असा संकल्प करून आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या चरणी अर्पण करून आर्यशीर्वाद घेतल्याच्या भावना व्यक्त केल्या.

ते पुढे बोलताना म्हणाले की माढा मतदारसंघात या परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार आहे. माढा मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकही अश्वारूढ पुतळा नाही ही खंत कोणाच्याही मनात राहू देणार नाही असा विश्वास दिला. आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर छत्रपतींचे दर्शन घेतल्यानंतर स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाचा इतिहास जाणून घेत असताना. महाराजांचे वंशज संभाजीराजे छत्रपती हे देखील योगायोगाने रायगडावर आले होते. यावेळी अभिजीत पाटील यांनी त्यांची आवर्जून भेट घेतली तसेच रायगडावर सुरू असलेल्या संवर्धन कार्याबाबत चर्चा केली. कोणतीही पूर्व सूचना न देता अचानक झालेली भेट आनंददायी ठरली असल्याच्या भावना आमदार पाटील यांनी व्यक्त केल्या.

याप्रसंगी त्यांचे रायगड दर्शन सुरू असताना एका ठिकाणी शाळेतील विद्यार्थी इतिहास जाणून घेत असताना त्यांना दिसले.

त्यामधील एका शिक्षकांनी आमदार अभिजीत पाटील यांना ओळखले आणि संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि योगायोगाने भेट झालेले स्वराज्याचे वंशज यांच्याशी संवाद साधता आल्याचा आनंद व्यक्त केला. यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर इतिहास जाणून घेण्यासाठी काढलेल्या अशा संस्कारित सहलीसाठी शिक्षकांचे अभिनंदन करत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे छत्रपती आणि भविष्यातील अनेक बालक छत्रपती यांची एकत्रित भेट म्हणजे इतिहास वर्तमान आणि भविष्य याचे एकत्रित दर्शन घेऊन नवी ऊर्जा घेऊन परतलो असल्याच्या भावना यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केल्या.

## थोडक्यात...

### चंद्रशेखर भांगे यांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय पत्रकारत्न पुरस्कार जाहीर



पुणे : अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित सोळाव्या छत्रपती संभाजी महाराज मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पुण्यातील कोरेगाव पार्क या ठिकाणी भांगे यांचा गौरव करण्यात येणार आहे. अक्कलकोट तालुक्यातील किरनळी गावचे सुपुत्र चंद्रशेखर भांगे हे पुण्यात लोकशाही न्यूज चैनल या मराठी वृत्तवाहिनीत पत्रकार म्हणून काम करत असून त्यांनी केलेल्या अनेक बातम्यांना अनेक विशेष पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

### सुरेश रणदिवे यांचे निधन

तावशी : पंढरपूर तालुक्यातील तावशी येथील वीज महामंडळातील माजी लायनमन श्री. सुरेश भाऊ रणदिवे यांचे राहत्या घरी वर्धापकाळाने वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले.



रक्षा विसर्जन गुरुवार दि. १२ डिसेंबर रोजी तावशी येथे सकाळी ७ वा. होणार आहे. त्यांनी सांगली जिल्ह्यातील पेड (ता.खानापूर) तसेच सोलापूर जिल्ह्यातील अकलूज (ता.माळशिरस), पंढरपूर, खेड भाळवणी (ता.पंढरपूर),तसेच बोराळे (ता. मंगळवेढा) येथे वायरमन, तंत्रज्ञ् व लाईनमन म्हणून वीज वितरण महामंडळामध्ये काम पाहिले. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. सहा. प्राध्यापक डॉ. नितीन रणदिवे व बांधकाम पर्यवेक्षक शेखर रणदिवे यांचे वडील होते.

### शेतात वृद्ध महिलेस सर्पदंश

सोलापूर : घरी झोपले असताना रमाबाई धोंडाप्पा वाघमारे (वय-६०,रा. सादेपूर,ता.दक्षिण सोलापूर) यांना सर्पदंश झाल्याने उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

### पैशाच्या वादातून तरुणास मारहाण

सोलापूर : कुर्डूवाडी येथील रिलायन्स वाईन शॉप जवळ पैसे देणे घेण्याच्या वादातून अजय लोंढे व गौतम वाल्मिकी यांनी मारहाण केल्याने विक्रम दिनेश जाधव (वय-४४,रा. सिव्हील लाईन, गांधीनगर) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

# आवळे विश्वगडच्या उपसरपंचपदी संजय गायकवाड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील आवळे विश्वगड या ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी ग्रामपंचायत सदस्य तथा काँग्रेसचे अनुसूचित जाती सेलचे तालुका ग्रामीण अध्यक्ष संजय गायकवाड यांची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत उपसरपंच मानसी मनोज पाटील यांनी राजीनामा दिल्याने रिक्त पदासाठी सोमवारी सरपंच प्रीती पवन देसले यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संजय गायकवाड यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा सरपंच प्रीती देसले यांनी केली. या निवडीनंतर ग्रामपंचायत सदस्य सरपंच प्रीती देसले, मावळत्या उपसरपंच मानसी पाटील, सदस्य नंदा पुंडलिक जाधव, वनिता मंगल पाटील, शरद बरकु भोईर, सलोनी सागर राऊत, दिलीप जाधव, संदीप जाधव, कीर्ती किशोर गायकर, ग्रामसेवक सचिन गोपाळ, लिपिक सागर भोईर तर आदी उपस्थित होते.

# निफाड पोलीस स्टेशनचे पो. नि. गुरव यांचे कार्यतत्परतेने टळले मोठे संकट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शनिवारी (दि.७) रोजी पहाटे अडीचच्या दरम्यान चोरट्यांनी एटीएम मध्ये प्रवेश केला व एटीएम च्या सीसीटीव्ही कॅमेरा वर रंग फवारून एटीएमची वायरिंग तोडली, मात्र सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केलेली असल्याने वायरिंग तोडल्यानंतर सदरचा मेसेज बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना गेला व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ निफाड पोलीस स्टेशनचे पो. नि. गणेश गुरव यांना सदर घटनेची माहिती दिली, कर्तव्यदक्ष पो. नि. गणेश गुरव यांनी कुठलाही विलंब न करता निफाड पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी पाठवीले परंतु पोलीस येत आहे याचा अंदाज दरोडेखोरांना लागताच तेथून त्यांनी पळ काढला व दरोड्याचा प्रयत्न फसला, एटीएमचा तोडण्याचा डाव उधळला , या घटनेमुळे मोठा अनर्थ टळला असून निफाड पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे,

**पोलिसांच्या सतर्कतेमुळे एटीएम तोडण्याचा डाव उधळला, दरोड्याचा प्रयत्न फसला**

सविस्तर वृत्ताचे के निफाड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार निफाड तालुक्यातील उगाव येथे रस्त्यालगत असणारी बँक ऑफ महाराष्ट्राचे एटीएम असून शनिवारी दि. सात रोजी पहाटे अडीचच्या सुमारास अज्ञात दरोडेखोर पिकप वाहन घेऊन या एटीएम जवळ येऊन एटीएम फोडण्याचा प्रयत्न करत असताना त्यांनी एटीएम ची वायरिंग तोडल्यानंतर सदरचा मेसेज बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना गेला त्यांनी तात्काळ पो नि गणेश गुरव यांना सदर घटनेची माहिती दिली व कर्तव्यदक्ष पो. नि गुरव यांनी निफाड पोलीस स्टेशनचे पथक पाठविले दरोडेखोरांना याचा सुगावा लागतच त्यांनी तेथून पळ काढला, पोलिसांच्या सतर्कतेमुळे एटीएम मधील रकमेची लूट होऊ शकली नाही, मोठे संकट टाळले या घटनेचि निफाड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून पो. नि. गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पो.उप.नि.विश्वनाथ निकम पोलीस हवालदार साळवे, घोलप, शिरसाट , आदी पुढील तपास करीत आहे,

# पंढरपूर अर्बन बँकेच्या व्यवहारावर कोणताही परिणाम नाही : मुळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर अर्बन बँकेच्या बारामती शाखेमधील व्यवस्थापकाने केलेल्या नऊ कोटी अपहाराचा कोणताही परिणाम बँकेच्या व्यवहारावर होणार नसून खातेदारांची सर्व रक्कम सुरक्षित आहे. याबाबत बँकेची सर्व रक्कम वसुलीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली.

पंढरपूर बँकेच्या बारामती शाखेचा व्यवस्थापक अमित प्रदीप देशपांडे याने आपल्या पदाचा गैरवापर करत नऊ कोटी तीन लाख रुपयाचा अंतर्गत बँकिंग फसवणूकीचा आर्थिक गैरव्यवहार केला आहे. याप्रकरणी बँकेने बारामती शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून देशपांडे याने गुन्ह्याची कबुली देखील दिली आहे. बँकेच्या अंतर्गत तपासणीमध्ये एक महिन्यापूर्वी सदर आर्थिक अपहार केल्याची माहिती समोर आली.

**शाखा बारामती येथील प्रकार; अपहार, चोरीबाबत बँकेकडे विमा पॉलिसी कार्यरत**

यानंतर तातडीने बँकेच्या अधिकाऱ्यांनी देशपांडे याची व त्याच्या कुटुंबातील सदस्यांची सर्व खाती गोठवली आहेत. हा प्रकार फक्त बारामती शाखेपुरता मर्यादित असून कोणत्याही ग्राहकांच्या खात्याशी संबधित नाही. यामुळे बँकेच्या कोणत्याही खातेदाराचे नुकसान झाले नाही.

शाखास्तरावर बनावट नावाची खाते काढून व्यवस्थापक देशपांडे याने हा प्रकार केला आहे. यामध्ये कोणत्याही ग्राहकांचे नुकसान झाले नसलेचे मागील १५-२० दिवसांचे तपासणी दरम्यान निश्चित झाले आहे. बँकेची अशा बाबीसाठी स्वतंत्र विमा पॉलिसी कार्यरत आहे. यामुळे बँकेच्या व्यवहारावर याचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे बँकेच्या व्हाईस चेअरमन माधुरी जोशी यांनी सांगितले.

दरम्यान राज्यात पंढरपूर अर्बन बँकेच्या ३० शाखा असून २५०० कोटी-हुन अधिक व्यवसाय आहे. झालेल्या अपहारामुळे सभासदांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नसून बँकेची आर्थिक परिस्थिती मजबूत आहे. याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असल्याचे बँकेचे सीईओ उमेश विरधे यांनी स्पष्ट केले.

# जि.प.शिक्षकाकडुन १०५ गरजू व निराधार विद्यार्थ्यांना शालेय साहीत्य वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी /राहुल साबळे : चिखली तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कवठळ येथे चांधई येथील श्री.संजय काळे सर हे उच्चश्रेणी विषयशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.यांनी आपल्या पत्नी सौ.शुभांगी संजय काळे यांच्या वाढदिवसानिमित्त कुठेही वायफळ खर्च न करता सामाजिक भावना जपत कवठळ येथे जि.प.शाळेत शिक्षण घेत असलेल्या १०५ गरजु विद्यार्थीनां पेन - पेन्सिलसह परीपुर्ण कंपास सेटसह शालेय साहीत्यचे वाटप केलं.व एक आगळावेगळ्या पध्दतीने आपल्या पत्नीचा वाढदिवस साजरा केला.

तसेच कोरोना व ईतर मोठ्या आजाराने आपले पितृछत्र गमावलेल्या काचंन अर्जुन गावंडे,सरला समाधान आराख,भारती समाधान आराख, कृष्णा शरद तोडे, शुभम शरद तोडे, या पाच विद्यार्थ्यांना स्कुलबॅाग, शालेय गणवेश,स्वेटर, टीपीनसेट,पाणिबॉटल, व ईतर शालेय साहीत्यांचेही वाटप करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक समाधान सावळे, सहशिक्षक सुहास पडघान, गणेश गिरी, परीहार सर, अंगणवाडी सेविका सौ. कहाडे, सौ.आराख ग्रामपंचायत सरपंच,उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, शाळा समीती अध्यक्ष,सर्व शाळासमीती सदस्य सह मोठय़ा संख्येने ग्रामस्थही उपस्थित होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनोखे अभिवादन**

**१२० विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग**

# सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने अठरा तास अभ्यास हा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी

सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने सी, बी खेडगी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अखंड अठरा तास अभ्यास हा उपक्रम राबविण्यात आला.

१२० विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग घेत, महापुरुषांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे वाचन करत तरुणाई आजही वाचनावर भर देते, असे दाखवून दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिक्षणासाठी असताना रोज १८ तास अभ्यास करीत असत. विद्यार्थ्यांच्या मनात हा विचार रुजावा, वाचन संस्कृती अधिक समृद्ध व्हावी, या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालयात प्राचार्य डॉ.आडवीतोटे सर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी ग्रंथपाल प्रा. आर. आर. कांबळे, डॉ.किशोर थोरे, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. गणपतराव कलशेट्टी, प्रा. विठ्ठल वाघमारे, प्रा. आबाराव सुरवसे, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे, रोहित उघडे, गंगाराम वाघमारे, साहिल कांबळे, श्रीधर दसाडे, दर्शन गायकवाड, प्रीती जैनजांगडे, लक्ष्मी गजधाने, अशोक इसापुरे आदी विद्यार्थी मुलं मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांना अल्पोपहार व भोजनाची सोय**

**सर्व विद्यार्थ्यांना फळ, अल्पोपहार, भोजन व बिस्किट चहा, पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श घेत विद्यार्थ्यांनी १८ तास अभ्यास करुन त्यांच्या विचारांना अभिवादन केले.**

या उपक्रमात १२० विद्यार्थी मुला-मुलींनी सहभाग घेत अभ्यासक्रमासह ग्रंथालयातील विविध पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. वंचित बहुजन आघाडी जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक आघाडी तालुका अध्यक्ष शीलामणी बनसोडे, प्रा.संध्या इंगळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वसतिगृहाचे अधीक्षक माळी, डॉ. सिद्धार्थ मुरूमकर, डॉ.आप्पासाहेब देशमुख यांनी उपक्रमाला भेट दिली. सकाळी सहा वाजता सुरू झालेला हा उपक्रम रात्री बारा वाजेपर्यंत चालला.

